अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. १० जानेवारी २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १०३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८




## अल्पवयीन तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या

सोलापूर : नईजिंदगी परिसरातील नागनाथ नगरात राहणाऱ्या एका १६ वर्षीय अल्पवयीन तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. फरजाना तौफिक अन्सारी (वय १६ रा. नागनाथ नगर,नई जिंदगी) असे मयत झालेल्या तरुणीचे नाव आहे. बुधवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास तिने राहत्या घरातील छताच्या लोखंडी अँगलला साडीच्या सहाय्याने गळफास घेतली होती. तिला फासातून सोडवून नातेवाईकांनी शासकिय रुग्णांना दाखल केले असता ती उपचारापूर्वी मयत झाली. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली असून यामागचे कारण समजले नाही.

## बहुचर्चित पंढरपूरचा विषय बासनातच!

# सांगोला, मंगळवेढा तालुक्यांना घेऊन नवा 'माणदेश' जिल्हा

### मंत्रालयस्तरावर प्रस्तावाला गती; सोलापूर जिल्ह्यातून दोन तालुके वगळले जाण्याची माहिती समोर

मुंबई-सोलापूर/खास प्रतिनिधी

राज्यात नव्याने जिल्ह्याची निर्मिती करण्याच्या प्रलंबित प्रस्तावांना मंत्रालय स्तरावर गती येत असल्याची माहिती समोर आली आहे. बहुचर्चित पंढरपूर जिल्ह्याच्या निर्मितीचा कोणताही प्रस्ताव अवलोकनासाठी पुढे घेण्यात आलेला नाही. तथापि, सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, मंगळवेढा या दोन तालुक्यांसह सांगली जिल्ह्यातील आटपाडी आणि जत तसेच सातारा जिल्ह्यातील माण व खटाव या दुष्काळी सहा तालुक्यांचा माणदेश हा नव्याने जिल्हा निर्माण करण्याचा प्रस्ताव मात्र मंजूरीसाठी आघाडीवर असल्याचे मंत्रालयातील सुत्रांकडून खात्रिलायकरित्या गुरुवारी (ता.९) सांगण्यात आले.

विशेष म्हणजे सध्या सोलापूर जिल्ह्यात समाविष्ट असलेले पंढरपूरनजिकचे सांगोला आणि मंगळवेढा हे दोन तालुके नव्या माणदेश जिल्ह्यात घेण्याचे जवळपास निश्चित झाल्यास पंढरपूर जिल्हा निर्मितीचे स्वप्न हे स्वप्न राहणार की काय असे मानले जात आहे. पंढरपूर जिल्हा निर्मितीसाठी यापूर्वी काही वर्षांपूर्वी प्रयत्न झाले होते.

मात्र मागच्या काही वर्षात या जिल्ह्याच्या निर्मितीचा विषय शासन स्तरावर 'लाल' फितीच्या कारभारात अडकला. दरम्यान, पंढरपूर लगतच्या सांगोला आणि मंगळवेढा तालुक्यांना समाविष्ट करुन माणदेश जिल्हा निर्मितीचा विषय ऐरणीवर आल्याने पंढरपूर जिल्ह्याचा विषय बासनात गुंडाळल्याचे स्पष्ट होत आहे.

सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी दोन तालुक्यांना घेऊन पंढरपूरऐवजी दुसराच जिल्हा निर्माण होण्याच्या निर्णयावर पंढरपूरचे लोकप्रतिनिधी नेमकी कोणती भूमिका भविष्यात घेतात? हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

राज्यात उदगीरनंतर आणखी २१ जिल्हे आणि ४९ तालुके नव्याने निर्माण करण्याच्या प्रस्तावाला गती आली आहे. नवीन जिल्ह्यांच्या निर्मितीसाठी सन २०१८ मध्ये मुख्य सचिवांच्या नेतृत्वाखाली समितीने २२ जिल्हे आणि ४९ तालुके निर्माण करण्याचा प्रस्ताव दिला होता. त्यालाच आता मुर्त स्वरुप देण्याच्या हालचाली गतीमान होत आहेत. राज्यातील ३५ जिल्ह्यांपैकी अहमदनगर जिल्ह्याचे त्रिभाजन, नाशिक, ठाणे जिल्ह्याचे दूभाजन तर तब्बल १७ जिल्ह्याचे विभाजन करण्याचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर विचाराधीन आहे. नवीन जिल्हा निर्मितीत सांगली, सातारा आणि सोलापूर या तीन जिल्ह्याचे विभाजन करुन नवा माणदेश हा दुष्काळी तालुक्यांचा जिल्हा निर्माण होणार आहे.

**वैराग तालुका निर्मितीचे काय? :** तालुका निर्मितीचे पार्श्वभूमीवर, सगळी परिस्थिती सकारात्मक असलेल्या वैराग शहराला तालुक्याचा दर्जा मिळण्याचा विषय तसा खूप जुना आहे. तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी वैरागला येऊन तालुका निर्मितीची घोषणा केली होती. शिवाय स्व. आमदार चंद्रकांत निंबाळकर यांनीदेखील तालुका निर्मितीसाठी हयातभर प्रयत्न केले होत. या तालुक्याच्या निर्मितीचा प्रश्नदेखील मागील कित्येक वर्षे प्रलंबित आहे. आता नव्याने ४९ तालुक्यांची निर्मिती होत आहे, त्यामध्ये वैराग तालुक्याचा समावेश आहे की नाही? यासंदर्भात तपशील मिळू शकला नाही. पण तालुका निर्मितीच्या प्रलंबित प्रश्नावर आता लोकप्रतिनिधींनी सजग होऊन ठोस प्रयत्न करण्याची गरज आहे..

# कोयत्याच्या सपासप वारानं हादरलं पंढरपूर


## प्रेम प्रकरणाला आड येणाऱ्या चुलत्यावर हल्ला

पंढरपूर/प्रतिनिधी

**स्थळ : पंढरपूरमधील गजबजलेला छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर... सकाळची ९ वाजण्याची वेळ... रस्त्यावर मोठी वर्दळ...जो तो घाईने आपापल्या कामासाठी मार्गस्थ होत असलेला...वाहतूक पोलीस वाहतुकीवर नियंत्रण ठेवून असलेले...अशात एका दुचाकी स्वाराची चौकात एंट्री होते...गर्दीतून वाट काढत दुचाकीस्वार पुढे सरसावण्याच्या तयारीत...तेवढ्यात दबा धरुन बसलेला तरुण हातात तळपता कोयता घेऊन पुढे येतो... तरुणाकडून दुचाकी अडवली जाते...पुढच्या क्षणी दुचाकीस्वरावर सपासप कोयत्याने वार सुरु होतात...दुचाकीस्वार गाडीसह खाली कोसळतो...रक्ताचा चिळकांड्या उडायला लागतात....वाहतूक पोलिसांचे घटनेवर लक्ष जाते...दोघे वाहतूक पोलीस जीवाची पर्वा न करता पुढे धावतात....वार करण्यापासून तरुणाला प्रतिबंध केला जातो...तरुणाला काबुत घेण्याचं धैर्य बहाद्दर वाहतूक पोलीस दाखवतात...रस्त्यावरची वर्दळ जैसे थे थांबते...बघ्यांची गर्दी होते..भर चौकात थरार घडतो...वर्दळीच्या ठिकाणी कोयत्याने सपासप वार केल्याची वार्ता वाऱ्यासारखी पंढरपूर शहरातसह तालुक्यात पसरते...शहरात दशहत माजते... घटनेने शहर जणू काही हादरतं...**




पंढरपूर : येथील छत्रपती शिवाजी चौकातील हेच ते ठिकाण जिथे सुभाष निमकर यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला.





जखमी सुभाष निमकर

सुभाष ज्योतीराम निमकर हे लाकूड वखारीचा व्यवसाय करत असून ते मजूर आणण्यासाठी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात गेले होते. यावेळी संशयित आरोपी यांनी जुन्या वादावरून निमकर यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. तेथे सेवेत असलेल्या वाहतूक पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून जखमीला पुढील उपचारासाठी खासगी दवाखान्यात दाखल केले आहे. संशयित आरोपी व सुभाष निमकर यांची पुतणी यांच्यात मैत्रीचे संबंध होते यावरून त्यांच्यात जुलै महिन्यात वाद झाला होता. यावेळी जखमी निमकर यांनी संशयित आरोपीला मारहाण झाली होती. हा राग मनात धरून संशयित आरोपीने निमकरांवर प्राण घातक हल्ला केला. आरोपीला ताब्यात घेतले असून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

– डॉ. अर्जुन भोसले, विभागीय पोलीस अधिकारी, पंढरपूर

एखाद्या चित्रपटालामधील दृश्याला साजेशा घटनेचा थरार गुरुवारी (ता.९) सकाळी दक्षिण काशी आणि अध्यात्मिक नगरी श्री क्षेत्र पंढपुरात झाला. मागच्या काही दिवसांपूर्वी असाच थरारा या शहरात झाला होता. ती घटनादेखील कोयत्याने सपासप वार करुन जीवघेणा निघृण हल्ला करण्याचीच होती, तद्नंतर आज तशीच कोयत्याच्या वाराची दुसरी घटना घडल्याने या शहरात कोयत्याची दशहत माजली असून कोयत्याने वार करण्याचा पुणे पॅटर्न आता पंढरपुरात गुन्हेगारांकडून राबवला जात असल्याने स्थानिक नागरिकांसह भाविकांमध्ये भितीचे वातावरण पसरल्याची वस्तुनिष्ठ स्थिती आहे.

जुन्या भाडंणाच्या कारणावरुन दाळे गल्ली येथील रहिवासी संशयित आरोपी अमित वाठारकर याने सुभाष निमकर यांच्यावर कोयत्याने सपासप वार करुन प्राणघातक हल्ला केला. सुभाष लिमकर हे कामानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ दुचाकिवरून जात असताना दबा धरून बसलेला संशयित आरोपी अमित वाटारकर यांनी त्यांची गाडी अडवली. त्यांच्यावर लगेच सपासप वार केले. घटनेदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे कार्यरत असलेले वाहतूक पोलीस श्री नदाफ आणि श्री खटकाळे यानी धावत जाऊन हल्लेखोराला त्वरित जेरबंद केले. वाहतूक पोलीसांनी तत्परता दाखवल्याने जखमीचे प्राण वाचले.

या धक्कादायक घटनेत सुभाष निमकर गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हल्लेखोर अमित वाठारकर हल्ला करीत असताना वाहतूक पोलिस त्याला पकडण्यासाठी प्रयत्न करीत असताना जमलेल्या लोकांना आरोपीस पकडण्यासाठी मदतीला या म्हणत असताना जमलेल्या लोकांनी फक्त बघ्याची भुमिका घेतली. कोणीही पुढे सरसावला नाही, अशा घटनेप्रसंगी सर्वसामान्य लोक फक्त बघ्याची भूमिका घेतात हे पुन्हा सिद्ध झाले.

### पुन्हा तोच प्रत्यय; केवळ बघ्याची भूमिका

पंढपुरातल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात गुरुवारी सुभाष निमकर यांच्यावर कोयत्याच्या वारातून प्राणघातक हल्ला होता. यावेळी चौकात मोठी वर्दळ होती. ये-जा करणाऱ्यांची गर्दी होती. प्रत्यक्ष प्राणघातक हल्ला होत असताना लोक थांबून ही घटना बघत होते. मात्र हल्लेखोरास अडविण्याची, त्याला हल्ल्या करण्यापासून रोखण्याची मानसिकता कोणीच दाखविली नाही. घटनास्थळी उपस्थित असलेल्यांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली. अप्रिय घटना घडत असताना लोक त्याचे चित्रीकरण करण्यासाठी धडपडतात, असाच प्रकार सर्रास दिसतो. त्याचाच प्रत्यय आजच्या पंढरपूरच्या घटनेतून पुन्हा आला.

## शाळेच्या बसची धडक; तरूणाचा मृत्यू

सांगोला : शाळेची बस व दुचाकीच्या झालेल्या अपघातात दुचाकी स्वार तरूणाचा गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला. ही घटना गुरुवार दि.९ जानेवारी रोजी दुपारी पावणेचारच्या सुमारास सांगोला-मिरज रोडवरील सर्विस रोडवरील सूतगिरणी समोर घडली. हनुमंत शिवाजी घोरपडे (वय ३०, रा. अकोला ता. सांगोला )असे अपघातात मरण पावलेल्या तरुणांचे नाव आहे. हनुमंत घोरपडे हा गुरुवारी दुपारी सांगोला मिरज रोड वरील सर्विस रोडवरून दुचाकिवरून जात होता. समोरून येणाऱ्या एम एच ४५-९०२८ या सिंहगड इन्स्टिट्यूट संस्था संस्थेच्या बसने त्याला धडक दिली. यात हनुमंत घोरपडे हा गंभीर जखमी झाला. त्यास उपचारासाठी चांगला येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले. याबाबत ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकिय अधिकारी डॉ.साळे यांनी पोलिसात खबर दिली आहे.

## अपघातात सेवानिवृत्त प्राचार्याचा मृत्यू

सांगोला : पिकप व दुचाकिच्या भीषण अपघातात सेवानिवृत्त प्राचार्य अप्पासाहेब सिद्राम इंगळे यांचा मृत्यू झाला. ही घटना घेरडी रोडवरी बाळू मामा मंदिरा जवळा (ता.सांगोला) येथे बुधवारी रात्री ९.३० च्या सुमारास घडली. अप्पासाहेब सिद्राम इंगळे (वय ७२, रा.घेरडी रोड,जवळा) हे आपल्या दुचाकी वरून घराकडून गावाकडे येत होते. दुधाच्या पिकप वाहनाची जोराची धडक बसल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. इंगळे हे विद्याविकास मंडळ जवळे या वत्सला देवी देसाई विद्यालय व अण्णासाहेब घुले सरकार कनिष्ठ महाविद्यालयातून निवृत्त झाले होते.

## मालट्रकच्या धडकेने मुख्याध्यापकाचा मृत्यू

मोहोळ : मोहोळकडे स्कुटीवर येणाऱ्या दोघांना पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या मालट्रकने धडक दिली. यात जि. प. शाळेतील मुख्याध्यापचा जागीच मृत्यू झाला तर पाठीमागील इसम गंभीर जखमी झाला. हा अपघात गुरुवारी दि.९ जानेवारी रोजी यावली जवळ सकाळी पावणेदहा वाजता घडला. राजेंद्र सुखदेव कारंडे (वय ५७ रा. यावली ता. मोहोळ) असे मृताचे नाव आहे.



राजेंद्र कारंडे हे कोळेगाव (ता. मोहोळ) येथे मुख्याध्यापक म्हणून जिल्हा परिषद शाळेमध्ये काम करत होते.ते आपल्या स्कुटी गाडीवरून विजय नामदेव राऊत (वय ६५, रा.यावली ता.मोहोळ) यांच्यासोबत मोहोळकडे निघाले होते. त्यांच्या गाडीच्या पाठीमागूनच मोहोळकडे जाणाऱ्या के. ए ५६ / ५६२५ या माल ट्रकने जोराची धडक दिली . त्यामुळे राजेंद्र कारंडे हे खाली पडले आणि त्यांच्या अंगावरून ट्रकचे चाक गेले आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.

पाठीमागे बसलेले नामदेव राऊत गंभीर जखमी झाले आहेत. याची फिर्याद समाधान कारंडे (वय ४५) यांनी दिली. ट्रकचालक जाफर वाहिदसाब (रा. निथूर, ता. भालकी, जि. बीदर कर्नाटक) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास अपघात पथकाचे चंद्रकांत आदलिंगे करत आहेत.

# आमदार देवेंद्र कोठेंचा पहिल्याच बॉलवर सिक्सर 'समांतर'साठी ८९ कोटींचा निधी आणला खेचून

- निधी वितरीत करण्याचे आदेश
- दुहेरी जलवाहिनी प्रकल्पाच्या कामाला येणार गती
- वचनपूर्तीच्या दिशेने पहिले दमदार यशस्वी पाऊल

सोलापूर/प्रतिनिधी



**सोलापूर शहर मध्यचे भाजपचे आमदार देवेंद्र कोठे यांनी सोलापूर आणि विस्तारीत भागासाठी अंथरण्यात येणाऱ्या उजनी-सोलापूर जलवाहिनीसाठी ८९ कोटी २९ लाखांचा निधी खेचून आणून आपल्या आमदारकीच्या ट्रॅकवर पहिल्याच बॉलवर निधीचा सिक्सर मारल्याचे मानले जात आहे. विधानसभा निवडणुकीत शहरवासियांना दिलेल्या वचनपुर्तीच्या दिशेने आमदार कोठेंचे पहिले यशस्वी दमदार पाऊल पडल्याचेसुद्धा मानले जात आहे. जलवाहिनीसाठी निधी वितरीत करण्याचे आदेश काढण्यात आल्याने हा प्रकल्प पूर्णत्वाकडे नेण्याला गती मिळणार आहे. शहरवासियांची तहान भागण्याच्यादृष्टीने कोठेंच्या प्रयत्नामुळे सुखावणारा निर्णय झाला आहे.**

सोलापूर आणि हद्दवाढ भागाच्या पिण्याच्या पाण्यासाठी उजनी ते सोलापूर अश दुहेरी अंथरण्याचे काम सुरु आहे. या जलवाहिनीच्या कामाच्या पूर्ततेकरिता ८९ कोटी २९ लाख रुपयांचा निधी वितरित करण्याचे आदेश नगर विकास विभागाने काढले आहेत. आमदार देवेंद्र कोठे यांनी याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

हिवाळी अधिवेशनात आमदार कोठे यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे सोलापूर शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सभागृहात मांडला होता. उजनी धरण सोलापूरच्या पाणीपुरवठ्यासाठी असूनदेखील सोलापूर शहराला आठवड्यातून केवळ एकदा पाणी मिळत आहे. सोलापूरच्या पाणीपुरवठ्यासाठी अंथरण्यात येत असलेल्या दुहेरी जलवाहिनीच्या ११० कि.मी.च्या कामापैकी १०६ कि.मी. जलवाहिनीचे काम पूर्ण झाले असून केवळ ४ कि.मी.चे काम शिल्लक राहिले आहे. महापालिकेने अद्याप जलशुद्धीकरण केंद्राची जागा ताब्यात घेतलेली नाही. राष्ट्रीय महामार्ग तसेच अन्य कारणांमुळे हे काम थांबल्याचे महापालिका सांगत आहे. त्यामुळे हे काम लवकरात लवकर पूर्ण करून शहराला नियमित पाणीपुरवठा करण्याबाबत प्रयत्न करावेत, अशी मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती.



संग्रहित छायाचित्र

आमदार देवेंद्र कोठे यांनी महापालिका आयुक्त शीतल तेली - उगले यांची भेट घेऊन जलवाहिनीचे काम पूर्ण होण्याकरिता असलेल्या अडचणींबाबत माहिती घेऊन त्या शासनापर्यंत पोचविल्या होत्या. याकामी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनीही शासनाकडे पाठपुराव्यासाठी सहकार्य केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रश्नाबाबत बैठक घेऊन वित्त सचिवांना उजनी सोलापूर दुहेरी जलवाहिनीसाठी निधी वितरित करण्याचे आदेश दिले होते.

गुरुवारी निधी वितरित करण्याबाबतचा आदेश महाराष्ट्र शासनाने काढला आहे. शासनाने दिलेल्या या निधीमुळे दुहेरी जलवाहिनीच्या पूर्णत्वास मोठी गती मिळणार आहे.

### पाणीदार आमदार अन् विकास दमदार


आमदार देवेंद्र कोठे यांनी विधानसभेच्या निवडणुकीत सोलापूर शहराच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्याचे आश्वासन शहरवासियांना दिले होते. दिलेला शब्द पाळत आमदार कोठे यांनी राज्य शासनाकडे पाठपुरावा करून उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीसाठी ८९ कोटी २९ लाख रुपयांचा निधी खेचून आणला. पाणीदार आमदार देवेंद्र कोठे यांची कामगिरी दमदार आहे, अशी प्रतिक्रिया नागरिक गणेश बुऱ्हाणपुरे यांनी दिली आहे.

### विकासाच्या वचनपूर्ततेशिवाय माघार नाही

सोलापूरच्या सर्वांगीण विकासाचे वचन आम्ही सोलापूर शहरवासीयांना दिले आहे. सोलापूरच्या पिण्याच्या पाण्यासह इतर सर्व नागरी प्रश्नांची सोडवणूक करण्यास प्राधान्य राहील. यासाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे सहकार्य लाभले, असे आ. देवेंद्र कोठे यांनी सांगितले.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्यांना 'सुरक्षित धागा' नाही सापडला!

| कल्याण |
| --- |
| 449-71-128 |

| मुंबई |
| --- |
| 560-12-679 |